**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या आर्थिक विषयक स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भर्तुहरी महताब यांची तर परराष्ट्र व्यवहार विषयक समितीच्या अध्यक्षपदी शशी थरूर यांची नेमणूक

- महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारीचा केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आढावा

- हिजबुल्लाहचा कमांडर मोहम्मद हुसेन स्रुर इस्राइलच्या हवाई हल्ल्यात ठार

**आणि**

- बांगलादेश विरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा भारताचा निर्णय

**<><><><><>**

संसदेच्या आर्थिक विषयक स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भर्तुहरी महताब यांची तर परराष्ट्र व्यवहार विषयक समितीच्या अध्यक्षपदी शशी थरूर यांची नेमणूक झाली आहे. माजी केंद्रीय मंत्री राधा मोहन सिंग हे संरक्षण विषयक तर राधा मोहन दास अग्रवाल गृहविषयक समितीचे अध्यक्ष राहणार आहे. सुनील तटकरे यांची पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, श्रीरंग बारणे यांची ऊर्जा विषयक समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली आहे. याशिवाय इतरही अनेक समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक झाली आहे.

**<><><><><>**

आज जागतिक पर्यटनदिन साजरा करण्यात येत आहे. अर्थव्यवस्थेच्या उभारणीत आणि सामाजिक सलोख्यात पर्यटनाचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी

दरवर्षी २७ सप्टेंबर रोजी जागतिक पर्यटन दिन साजरा केला जातो. यंदाच्या दिनाची संकल्पना पर्यटन आणि शांती अशी आहे. पर्यटनदिनाचा प्रमुख कार्यक्रम नवी दिल्ली इथं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या उपस्थितीत झाली. जबाबदार आणि शाश्वत पर्यटन ही काळाची गरज असल्याचं केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या महासंचालक मुग्धा सिन्हा यांनी आकाशवाणीला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. जागतिक पातळीवर शांती आणि समृद्धीसाठी ग्रामीण भागातल्या तसंच महिला आणि युवा सक्षमीकरणावर भर देणाऱ्या पर्यटनाची गरज असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

पुणे मेट्रोच्या मार्गाचं लोकार्पण आणि भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे येत्या रविवारी होणार आहे. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली आहे. पावसामुळं काल होणारा हा कार्यक्रम पुढे ढकलला होता.

**<><><><><>**

कार्बन उत्सर्जन २०७० पर्यंत शून्य करण्याचं सरकारचं लक्ष्य आहे. राज्याचं नवीकरणीय ऊर्जेचं उत्पादन २०३० पर्यंत ५० टक्के करण्याच्या दिशेने सरकारनं सामंजस्य करार केल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. मुंबईत काल हरित ऊर्जा क्षेत्रातल्या ४ कंपन्यांच्या सोबत सामंजस्य करार झाले. ४७ हजार ५०० कोटींच्या सामंजस्य करारामुळे १८ हजारांहून अधिक रोजगार निर्मिती होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

याशिवाय जल विद्युत निर्मितीसाठीच्या पम्प्ड स्टोरेज प्रकल्पासाठी काल ३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार झाले. या करारांमधून ८२ हजार २९९ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून त्यामुळे १८ हजार ४४० रोजगार निर्माण होणार आहेत. या करारामुळे १५ हजार १०० मेगावॉट वीज निर्मिती होणार आहे. यापूर्वी

५५ हजार ९७० मेगावॅट वीज निर्मितीसाठी करार करण्यात आले आहेत. यामध्ये ३ लाख कोटींची गुंतवणूक आणि ९० हजार ३९० इतकी रोजगार निर्मिती होत असल्याचे फडनवीस यांनी सांगितले.

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाचं पथक काल रात्री मुंबईत दाखल झालं. दोन दिवसांच्या आपल्या दौऱ्यात निवडणूक आयोगाचे अधिकारी, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, मुख्य निवडणूक अधिकारी, मुख्य सचिव यांच्यासह राज्यातल्या विविध अधिकाऱ्यांची विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक घेणार आहेत. निवडणूक आयोग आज विविध राजकीय पक्षांसोबत चर्चा करत आहे.

**<><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या आणि अखेरच्या टप्प्यातला प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. या टप्प्यात ४० मतदारसंघांमधे येत्या १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. आकाशवाणीच्या जम्मू वार्ताहरानं कळवलं आहे की, विविध राजकीय पक्षांनी प्रचारसभा,आणि रोड शोचा धडाका लावला आहे. मतदारांशी वैयक्तिक भेटून प्रचारावरही भर दिला जात आहे. भाजपाचे प्रमुख प्रचारक, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची प्रचारसभा उद्या जम्मूच्या मौलाना आझाद स्टेडियममधे होणार आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या सभा आज रामगढ आणि छांब इथं होणार आहेत. मतमोजणी येत्या ८ ऑक्टोबरला होणार आहे.

**<><><><>**

मंकी पॉक्स आजारासंबंधी जनजागृतीसाठी आवश्यक पावलं उचलावी असं केंद्रीय  आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयानं सर्व राज्यसरकारं आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांना सांगितलं आहे. मंकी पॉक्सचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीनं

मंत्रालयाने सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यात चाचणीसाठी कार्यरत प्रयोगशाळांची यादीही दिली आहे. संसर्ग रोखणे, उपचारांसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देणे, आवश्यक तिथे विलगीकरणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे या गोष्टींची काळजी घ्यावी. राज्यात या विषाणूच्या प्रादुर्भाव- प्रसारावर बारकाईने लक्ष ठेवावं असं आरोग्यमंत्रालयाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

नागरिकांचे आधार आणि पॅन खुले करणाऱ्या वेबसाइट सरकारनं ब्लॉक केल्या आहेत. नागरिकांच्या आधार क्रमांकाची माहिती खुली करणाऱ्या वेबसाइट विरोधात UIDAI नं तक्रार दाखल केली होती. त्यानंतर ही कारवाई झाली आहे. काही वेबसाइटमध्ये असलेल्या सुरक्षा त्रुटी इंडियन कम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमनं संबंधिताच्या नजरेस आणल्या आहेत आणि त्यांना आवश्यक बदल करायला सांगितले आहेत.

**<><><><><>**

गेल्या काही वर्षात नवोन्मेष क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे भारतानं, यंदाच्या जागितक नवोन्मेष निर्देशांक म्हणजेच जीआयआय २०२४ मध्ये १३३ देशांत ३९ व्या स्थानावर झेप घेतली आहे. २०१५ मध्ये ८१ व्या स्थानावर असलेल्या भारताची ही लक्षणीय झेप आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी याबाबत समाज माध्यमावरून एक संदेश प्रसारित केला आहे. भारतानं मध्य आणि दक्षिण आशियातल्या दहा अर्थव्यवस्थांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला असून, कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये भारत पहिल्या क्रमांकावर असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

‘एक पेड मा के नाम’ अभियानाअंतर्गत देशात ८० कोटी झाडांची लागवड झाली आहे. पर्यावरण मंत्रालयानं २५ सप्टेंबरला हे लक्ष्य साध्य केलं. उत्तर प्रदेशात सर्वाधिक २६ कोटी झाडांची लागवड झाली.

**<><><><><>**

आंध्रप्रदेश सरकारने तिरुपती मंदिरातल्या प्रसाद भेसळीप्रकरणी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. भारतीय पोलीस सेवेतले वरिष्ठ अधिकारी सर्व श्रेष्ठ यांची पथकाच्या प्रमुखपदी नेमणूक झाली आहे.

**<><><><><>**

तमिळनाडूत विरुधुनगर जिल्ह्यात श्रीवल्लीपुथुर इथं आज पहाटे झालेल्या रस्ता अपघातात ४ जण ठार झाले तर १० जण जखमी झाले. ३५ प्रवाशांना घेऊन जाणारी मिनिबस उलटल्याने हा अपघात झाला. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं असून पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

**<><><><><>**

राज्यातले माजी मंत्री आणि काँग्रेस नेते रोहिदास पाटील यांचं आज पहाटे अल्पशा आजारानं निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. राज्य सरकारमध्ये ते पाटबंधारे खात्याचे मंत्री होते. आमदार कुणाल पाटील यांचे ते वडील होते. त्यांच्या पार्थिवावर उद्या धुळ्यात SSVPS महाविद्यालयाच्या मैदानावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

हिजबुल्लाह चा कमांडर मोहम्मद हुसेन स्रुर काल इस्राइलच्या हवाई हल्ल्यात मारला गेला. लेबननची राजधानी बैरुतमध्ये इस्राइलनं काल अनेक हवाई हल्ले केला. त्यात तो ठार झाल्याची माहिती इस्राइलच्या लष्करानं दिली आहे. इस्राइलवर हवाई हल्ले करणं, ड्रोन आणि क्रुझ क्षेपणास्त्र टाकण्याची जबाबदारी त्याच्यावर होती.

लेबननमध्ये ड्रोन उत्पादन केंद्र स्थापन केल्याचा आरोप त्याच्यावर होता. या संघर्षात हजारो लोक विस्थापित झाले असून अनेक जण सीरियात जाण्याच्या प्रयत्नात आहेत. लेबनन आणि इस्राइलमधले युद्ध वाढलं तर नागरिकांना सुरक्षितरित्या कुठे हलवता येईल याची चाचपणी पाश्चिमात्य देश करत आहेत. सायप्रस आणि तुर्कस्थान ही संभाव्य ठिकाणं असू शकतात.

**<><><><><>**

जपानचे नवे प्रधानमंत्री म्हणून शिगेरू इशिबा हे निवडून आले आहेत. इशिबा यांनी २१५ मतं मिळवून प्रतिस्पर्धी उमेदवार साने ताकाईची यांचा पराभव केला आहे. येत्या ऑक्टोबर महिन्यात जपानच्या संसदेची बैठक झाल्यानंतर इशिबा हे जपानचे प्रधानमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारतील.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा आणि अंतिम सामना आजपासून सुरु झाला आहे. कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर सकाळी साडे नऊ वाजता या सामन्याला सुरुवात झाली. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

शेवटचं बातमी हाती आली तेव्हा बांगलादेशाच्या ३ बाद ८० धावा झाल्या होत्या.
भारत पहिली कसोटी जिंकत मालिकेत १-० ने आघाडीवर आहे. या सामन्यासाठी पहिल्या कसोटीचा संघ भारतानं कायम ठेवला आहे.

**<><><><><>**

येत्या २९ सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशविदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११४वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व

वाहिन्यांवर, आकाशवाणी वृत्त संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवर प्रसारित केला जाईल.

**<><><><><>**

पावसामुळे झालेल्या विविध घटनांमध्ये राज्यात गेल्या चोवीस तास ३ जण मरण पावले असून ६ जण जखमी झाले आहेत. राज्यातल्या विविध धरणात ८८ टक्क्यांहून अधिक पाणीसाठा आहे. गेल्यावर्षी या कालावधीत हे प्रमाण सुमारे ७१ टक्के होतं.

**//<><><><><>//**